विद्यार्थी सेवा विभागाच्या प्रभारी संचालकपदी डॉ. अतकरे



ज्ञानगंगोत्री : विद्यापीठाच्या विद्यार्थी सेवा विभागाच्या प्रभारी संचालक पदी विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. प्रकाश अतकरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

विद्यमान कुलगुरू प्रा. ई वायुनंदन यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक सेवा सुविधा, त्यांच्या अडचणी, प्रश्न तसेच विभागीय केंद्रांत सुसूत्रता आणण्याच्या दृष्टिकोनातून डॉ. प्रकाश अतकरे यांच्याकडे या विभागाची जबाबदारी सोपविली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल कुलगुरू प्रा. वायुनंदन, कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे आदींनी अभिनंदन केले आहे. 'यशवार्ता' परिवारातर्फे अभिनंदन.

वाढदिवसाच्या शुभेच्छा ...!

• श्री. राजाराम ब्रिजलाल पाटील	१ एप्रिल
• सौ. सुमेधा कांचन थोरमिसे	१ एप्रिल
• डॉ. मधुकर निंबा शेवाळे	२ एप्रिल
• श्री. रवींद्र विश्वनाथ रनाळकर	३ एप्रिल
• श्री. हेमंत एकनाथ मुसळे	४ एप्रिल
• श्री. मगन भगवान पाटील	५ एप्रिल
• श्री. दिलीप देवराम साळुंके	७ एप्रिल
• सौ. माधुरी किरण चौरे	११ एप्रिल
• सौ. स्मिता प्रभाकर सोनसळे	११ एप्रिल
• श्री. चंद्रकांत सुरेश पवार	१३ एप्रिल
• श्री. यशवंत रघुनाथ दुसाने	१७ एप्रिल
• श्री. प्रमोद रंगनाथ जावळे	१८ एप्रिल
• श्री. प्रदीपकुमार दामोदर पवार	१९ एप्रिल
• श्री. सुनील मधुकर कोठावदे	२४ एप्रिल
• श्री. प्रदीप आनंदराव शिंदे	२६ एप्रिल
• श्री. वाल्मीक विश्वनाथ सांगळे	२७ एप्रिल
• श्री. विनोद चिंतामणराव इंगळे	२८ एप्रिल

कैलास बोरसेंना अमरावती विद्यापीठाची पीएच.डी.



अमरावती : विद्यापीठाच्या अमरावती विभागीय केंद्राचे सहायक कुलसचिव कैलास भटा बोरसे यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची समाज विज्ञान विद्याशाखेंतर्गत पीएच.डी. मिळाली आहे.

विद्यापीठाच्या नुकत्याच पार पडलेल्या दीक्षान्त समारंभात बोरसे यांना पीएच.डी. प्रदान करण्यात आली. 'उत्तर महाराष्ट्रातील धनगर समाजाच्या सामाजिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन' हा त्यांच्या शोध प्रबंधाचा विषय होता. डॉ. अरुणसिंह चौहान यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संशोधन पूर्ण केले. त्यांच्या या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन, कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले असून विद्यापीठ परिवारानेही श्री. बोरसे यांचे अभिनंदन केले आहे.

कैवल्य ओकला राष्ट्रीय विज्ञान ऑलिम्पियाडमध्ये सुवर्ण



नाशिक : विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागातील वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार सौ. शर्मिष्ठा चिन्मय ओक यांचे चि. कैवल्य याने राष्ट्रीय विज्ञान ऑलिम्पियाड परीक्षेत सुवर्णपदक पटकावले आहे. सायन्स ऑलिम्पियाड फाऊंडेशन इयत्ता पहिलीसाठी नुकतीच परीक्षा घेण्यात आली.

येथील ईस्पॅलिअर द एक्सपरीमेंटल स्कूलमध्ये कैवल्य शिक्षण घेत असून या परीक्षेत तो शाळेत पहिला, महाराष्ट्र आणि गोवा विभागात तो ११वा तर आंतरराष्ट्रीय स्तरावर ३३व्या स्थानावर आहे. याशिवाय कैवल्यने आंतरराष्ट्रीय गणित आणि इंग्रजी ऑलिम्पियाड परीक्षेतही रौप्यपदक मिळविले आहे. त्याला ईस्पॅलिअर द एक्सपरीमेंटल स्कूलच्या मुख्याध्यापिका तसेच वर्ग शिक्षक यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. त्याच्या या यशाबद्दल शिक्षणतज्ज्ञ सचिन जोशी आदींनी अभिनंदन केले आहे. तसेच 'यशवार्ता' परिवारातर्फे अभिनंदन.

वाढदिवसाच्या शुभेच्छा ...!

• श्री. सतीश दिगंबर मराठे	१ मे
• श्री. नितीन जयसिंग ठोके	१ मे
• श्री. अनंत भिकाजी खळेकर	२ मे
• श्री. किशोर विश्वनाथ मोरे	२ मे
• श्री. राजू कृष्णा खरपडे	३ मे
• श्री. उत्तम रघुनाथ जाधव	५ मे
• श्री. सोमनाथ भिकाजी टिक्कल	५ मे
• श्री. सुधाकर शिवाजी निंबाळकर	६ मे
• श्री. गणेश यशवंत चव्हाण	८ मे
• सौ. शर्मिला जयंत कुलकर्णी	९ मे
• श्री. रत्नाकर शंकर कोठावदे	१० मे
• श्री. चंद्रकांत दिनकर शेजवळ	१० मे
• सौ. वंदना मोहन फेगडे	१० मे
• श्री. मिलिंद नारायणराव हिंगणे	१३ मे
• श्री. देविदास संतू जाधव	१३ मे
• सौ. अनिता दिलीप डांगरे	१३ मे
• सौ. प्रभा शाम पाटील	१४ मे
• श्री. सुनील दगाजी सोनवणे	१४ मे
• सौ. गायत्री सुनील हिंगणे	१५ मे
• श्री. गुलाब रामदास अहिरे	१५ मे
• श्री. मनोहर गुलाबराव पाटील	१५ मे
• श्री. शशिकांत दामोधर ठाकरे	१९ मे
• श्री. विजय बाळासाहेब चव्हाण	२४ मे
• श्री. दयाराम दुधाराम पवार	२५ मे
• डॉ. शाम भाऊसाहेब कडूस	२६ मे
• सौ. हेमलता वसंतराव निकम	२७ मे
• डॉ. उमेश मधुकर राजदेरकर	२८ मे
• श्री. हिरालाल दामोदर माळवे	२८ मे
• श्री. विजय रामचंद्र भंडारे	३० मे
• श्री. सतीश रामचंद्र बोरसे	३१ मे
• श्री. रमेश बन्सी वाघ	३१ मे
• श्री. कैलास वेडू शिंदे	३१ मे
• श्री. सचिन दगू कटारे	३१ मे

कार्यकारी संपादक : संतोष साबळे, **निर्मिती :** आनंद यादव, **सदस्य :** विवेक ओक, **छायाचित्रे :** राजेश बर्वे **मुद्रक व प्रकाशक :** डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक - ४२२ २२२, **मुद्रक :** नरेंद्र शाळिग्राम, मे. रिप्लिका प्रिंटर्स, वकीलवाडी, नाशिक. **अक्षरजुळणी व मांडणी :** बाबा जाधव (खासगी वितरणासाठी)

ज्ञानगंगा घरोघरी
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
एप्रिल-मे २०१७ अंक ४५
यशवार्ता

विद्यापीठात महाराष्ट्र दिन साजरा

विद्यापीठाचा झेंडा सातासमुद्रापार : कुलगुरू प्रा. वायुनंदन



ज्ञानगंगोत्री : विद्यापीठाचे कार्य, शैक्षणिक प्रगती, विद्यार्थ्यांना केलेले ज्ञानदानाचे कर्तव्य आणि अत्यंत कमी मनुष्यबळात विविध शिक्षणक्रमांना प्रवेशित करून सर्वाधिक विद्यार्थ्यांना शिक्षित केल्याने या विद्यापीठाचे काम देशभरातील अन्य विद्यापीठांच्या तुलनेत उल्लेखनीय असल्याचे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन यांनी केले. महाराष्ट्र राज्य स्थापनेचा वर्धापनदिनोत्सव विद्यापीठात साजरा करण्यात आला. या वेळी ते बोलत होते.

यशवंतराव चव्हाण यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन, कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे, वित्त अधिकारी मगन पाटील, परीक्षा नियंत्रक डॉ. अर्जुन घाटुळे, उपकुलसचिव सुनील बर्वे आदींनी अभिवादन केले. त्यानंतर कुलगुरूंच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन पुढे म्हणाले, देशाच्या विकासात महाराष्ट्राचे योगदान अतिशय उल्लेखनीय आहे. हैद्राबाद येथे नुकत्याच झालेल्या कुलगुरू परिषदेच्या आजवरच्या इतिहासात प्रथमच मुक्त शिक्षण पद्धतीवर विशेष सत्र होऊन त्यात विशेष चर्चा घडून आली असून या परिषदेत विद्यापीठाच्या कामकाजाचे कौतुक झाल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने हे विद्यापीठ ज्ञानदानाचे कार्य गेल्या २७ वर्षांपासून यशस्वीपणे करीत आहे. त्यांचे विचार पुढे नेण्यासाठी सर्वांच्याच पुढाकाराची गरज असून त्यासाठी कटिबद्ध राहा, असे आवाहन करून त्यांनी विद्यापीठ सहकारी आणि कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे यांनीही या वेळी सर्वांना शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले, हे लोकविद्यापीठ असून समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचण्याकरिता नवनिर्वाचित कुलगुरू घेत असलेले निर्णय समाजाचा विकास साधण्यासाठी निश्चितच साहाय्यभूत ठरतील. या वेळी विद्यापीठातील विविध विद्याशाखांचे संचालक, प्रमुख, शिक्षक, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्यातील कैद्यांना मुक्त विद्यापीठ देणार मोफत शिक्षणाचे धडे

कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन यांचे प्रतिपादन




ज्ञानगंगोत्री : वेगवेगळ्या गुन्ह्यांबद्दल शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांची गुन्हेगारी मानसिकता बदलून त्यांना पुन्हा समाजात एक चांगला नागरिक म्हणून जगता यावे, यासाठी राज्यातील सर्व कारागृहांत विद्यापीठातर्फे मोफत विविध पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम उपलब्ध करून देणार असल्याचे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन यांनी केले.

मुक्त विद्यापीठ आणि योग विज्ञान प्रबोधिनी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक मध्यवर्ती कारागृहात कैद्यांसाठी योगशिक्षक प्रशिक्षण वर्गात गेल्या वर्षभरापासून योगाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्यात येत होते. या एक वर्षाच्या योग पदविका प्रशिक्षण वर्गाचा पारितोषिक वितरण समारंभ नुकताच आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी ते बोलत होते.

या वेळी व्यासपीठावर आ. बाळासाहेब सानप, डॉ. प्रेमचंद जैन, विद्यापीठाच्या आरोग्य विज्ञान विद्याशाखेचे संचालक डॉ. जयदीप निकम, डॉ. किरण जैन, कारागृहाचे उपअधीक्षक प्रमोद वाघ, वरिष्ठ तुरुंग अधिकारी श्रीमती पल्लवी कदम, श्रीमती गुजराती उपस्थित होते. या वेळी योगशिक्षक पदविका अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या २१ बंदिजनांना कुलगुरू प्रा. वायुनंदन आणि मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. विशेष म्हणजे यात नायजेरियाच्या एका कैद्याचाही समावेश आहे.



विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू तथा ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. राम ताकवले यांचा वाढदिवस नुकताच झाला. या वेळी विद्यापीठाच्या वतीने त्यांना शुभेच्छा देताना पुणे विभागीय केंद्राचे प्रभारी संचालक उत्तम जाधव.



असा मी असा मी

प्रमोद जावळे

- **संपूर्ण नाव :** प्रमोद रंगनाथराव जावळे
- **आवडता छंद :** ट्रेकिंग, सायकलिंग
- **आवडती डिश :** नॉनव्हेज
- **आवडते गाणे :** या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे
- **आवडते पर्यटनस्थळ :** मालवण (तारकर्ली)
- **आवडता खेळ :** बास्केटबॉल, हॉकी
- **जीवन म्हणजे :** सर्वांनी समानतेने व प्रेमाने जगणे
- **अविस्मरणीय क्षण :** ट्रेकिंगच्या वेळी झालेल्या अपघातात सहकाऱ्याला वाचविताना क्षण
- **आदर्श व्यक्ती :** मा. प्रधान सर (मा.कुलगुरू)
- **आवडलेले पुस्तक/नुकतेच वाचलेले पुस्तक :** शेतकऱ्याचा आसूड
- **आवडता सहकारी आणि का :** प्रदीपकुमार पवार - स्वभावाने अतिशय चांगली व्यक्ती
- **कशाची सगळ्यात जास्त भीती वाटते :** राजकारणी व्यक्तींची
- **एका वाक्यात स्वत:बद्दल सांगा :** शांत व निसर्गरम्य ठिकाणी जायला आवडते
- **कोणता शब्द, वाक्य नेहमी उच्चारता :** ठीक आहे
- **स्वत:च्या स्वभावातली कोणती गोष्ट बदलायला आवडेल :** स्वत: त्रागा करून घेणे
- **दैनंदिन जीवनातील सगळ्यात महत्त्वाची गोष्ट :** कोणत्याही संकटाला सामोरे जाणे
- **समाजातील खटकणारी बाब कोणती :** बेजबाबदारपणे वागणारी तरुण पिढी व बालिकांवर होणारे लैंगिक अत्याचार
- **राहून गेलेली गोष्ट :** रोलर स्केटिंग शिकणे
- **विद्यापीठाचा आवडता विभाग :** अर्थातच, संगणक केंद्र
- **विद्यापीठाच्या कार्यपद्धतीत कोणता सकारात्मक बदल सुचवाल :** विद्यापीठाचे जिल्हा व विभागीय केंद्र सक्षम करणे

डॉ. संजीवनी महाले सावित्रीबाई फुले राष्ट्रीय फेलोशिपने सन्मानित



मुंबई : दलित बांधवांचा उद्धार करण्यासाठी माजी उपपंतप्रधान बाबू जगजीवन राम आणि डॉ. सोहनपालजी सुमनाक्षर यांनी सुमारे ३२ वर्षापूर्वी भारतीय दलित साहित्य अकादमीची स्थापना केली होती. या अकादमीतर्फे भारतातील विविध राज्यांमधील दलितांच्या उद्धारासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींना राष्ट्रीय दलित साहित्यकार संमेलनात पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. त्याचाच एक भाग म्हणून विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या संचालक डॉ. संजीवनी महाले यांना अलीकडेच माजी आमदार बबनराव घोलप, माजी सामाजिक न्यायमंत्री आणि राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. एस. पी. सुमनाक्षर ह्यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले राष्ट्रीय फेलोशिप देऊन सन्मानित करण्यात आले. याबरोबरच डॉ. महाले यांना समता साहित्य अकादमीतर्फे नियोजन मंडळाचे माजी अध्यक्ष श्री. सोनाग्री आणि डॉ. भूषण कर्डिले यांच्या उपस्थितीत International Excellence पुरसस्काराने सन्मान करण्यात आला. विशेष म्हणजे विद्यापीठाचे माजी कुलगुरू कै. डॉ. आर. कृष्णकुमार यांच्या पुढाकारातून चर्मकार व्यावसायिकांसाठी सुरू करण्यात आलेल्या शिक्षणक्रमामुळे डॉ. महाले यांना ही संधी मिळाली होती. तसेच या प्रकल्पासाठी त्यांना सुमारे १२ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. डॉ. महाले यांच्या या सन्मानाबद्दल विद्यापीठ परिवारातर्फे अभिनंदन.

प्रा. रावसाहेब पाटील यांचा दौलतराव कडलग पुरस्काराने सन्मान



ज्ञानगंगोत्री : कृषी क्षेत्रात शेतकऱ्यांच्या उत्थानासाठी उल्लेखनीय कार्य करीत असल्याबद्दल विद्यापीठाच्या कृषिविज्ञान केंद्राचे प्रमुख प्रा. रावसाहेब पाटील यांचा इंडियन चेंबर ऑफ ॲग्रिकल्चरतर्फे दौलतराव कडलग प्रेरणा पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

कष्टकरी, शेतकरी, ग्रामीण युवक-युवतींना कृषितंत्रज्ञानाचे अद्ययावत व्यावसायिक प्रशिक्षण देणे हे सर्वात महत्त्वाचे कार्य कृषिविज्ञान केंद्रामार्फत केले जाते. तसेच शेतकऱ्यांच्या मूलभूत गरजांचा आणि संबंधित प्रदेशातील हवामान, पिके, साधनसामग्री या बाबींचा बारकाईन विचार करून प्रशिक्षणाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. प्रा. पाटील यांना देण्यात आलेल्या या सन्मानाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन, कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे आदींनी अभिनंदन केले आहे. 'यशवार्ता' परिवारातर्फे अभिनंदन.

आंबेडकरांचे विचार अंगीकारण्याची गरज - डॉ. प्रल्हाद लुलेकर



ज्ञानगंगोत्री : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार विश्व समग्र होते. त्यांनी पाणी, ऊर्जा, जलमार्ग, कृषी, आर्थिक, पर्यावरण, सामाजिक न्याय, राष्ट्रवाद अशा विविध विषयांवर मूलभूत विचार मांडले. यामुळे त्यांचे समग्र विचार कृतीत उतरवून स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूलतत्त्वे प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याची नितांत गरज असल्याचे प्रतिपादन ख्यातनाम साहित्यिक, समीक्षक डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी केले.

विद्यापीठात नुकतेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाच्या वतीने 'दलितेतरांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन होते. या वेळी व्यासपीठावर कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख प्रा. नागार्जुन वाडेकर उपस्थित होते.

...अन् चतुर्थश्रेणी कामगारांच्या मुलांना ज्ञानाची कवाडे झाली खुली



एरवी शेतात, कार्यालयात मिळेल ते काम करणारे कर्मचारी वर्षभर ऊन, वारा, पाऊस, थंडी यांची कुठलीही पर्वा न करता राबत असतात. मात्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे नवनिर्वाचित कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन यांनी विद्यापीठात वर्षानुवर्षे राबणाऱ्या अशाच चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या मुलांना विद्यापीठ आवारातील अद्ययावत ग्रंथालय आणि माहितीस्रोत केंद्र खुले केले आहे. कुलगुरूंनी घेतलेल्या या निर्णयामुळे चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या मुलांना ज्ञानाची कवाडे खुली झाली आहेत.



क्षितिजापलीकडे

संतोष साबळे, कार्यकारी संपादक

समाजातील वंचित आणि दुर्लक्षित घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांना शिक्षित करण्याचे काम मुक्त विद्यापीठ गेल्या २७ वर्षांपासून करीत आहे. मात्र असे असताना विद्यापीठाच्या परिसरात निरनिराळ्या ठिकाणी काम करणारे चतुर्थश्रेणी कर्मचारी आपले काम आणि निष्ठा या पलीकडे कधी गेले नाहीत. दरम्यान, अलीकडेच विद्यापीठाच्या



कुलगुरूपदाची सूत्रे हाती घेतलेले प्रा. ई. वायुनंदन यांना काही दिवसांपूर्वी कर्मचाऱ्यांची १५-२० मुले विद्यापीठ परिसरात बागडताना आढळून आली. त्यांनी त्या मुलांशी आपुलकीने संवाद साधला आणि तुम्हाला कशाची आवड आहे, सुटीत काय करायला आवडते, अभ्यासाव्यतिरिक्त इतर पुस्तके वाचायला आवडतील का, संगणक शिकायला आवडेल का अशा प्रकारे संवाद साधला. यावर मुलांकडूनसुद्धा तसाच प्रतिसाद मिळाला. त्यांनी कधी चार भिंतीबाहेरचे जग पाहिले नव्हते अशा सर्वांनीच लागलीच होकार दिला. अन् मग काय जे घडायचं तेच घडले.

कुलगुरूंनी सर्व मुलांना विद्यापीठातील अद्ययावत ग्रंथालय आणि माहितीस्रोत केंद्रात नेऊन पुस्तकांचे आकाश खुले करून दिले. त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन अनेक आदर्श दाखवून दिले. याकरिता ग्रंथालय केंद्राचे प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे आणि सहायक ग्रंथपाल प्रकाश बर्वे हे अशा सर्व मुलांना पुस्तकांशी नाते कसे जोडावे, वाचावे कसे, कोणत्या प्रकारची पुस्तके वाचावीत अशा अनेक गोष्टी शिकवितात. जीवनात पुस्तकांचे किती महत्त्वाचे स्थान आहे हे समजावून वाचन संस्कृती जोपासण्याचा आत्मविश्वास दिला. निसर्गरम्य वातावरणात मोठ्या दिमाखात उभ्या असलेल्या वातानुकूलित ग्रंथालयात ज्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांनी आजपर्यंत पायही ठेवला नाही अशा कर्मचाऱ्यांच्या मुलांना थेट पुस्तकांचे आकाश खुले झाल्याने शंभराहून अधिक कर्मचाऱ्यांच्या जीवनात प्रकाशाची नवी किरणे पाहायला मिळताहेत.

विद्यापीठ परिवारात संचालक, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी यांच्याप्रमाणेच विद्यापीठाचे साफसफाई कर्मचारीही तितकेच महत्त्वाचे असून त्यांनाही सन्मानाची वागणूक देऊन कुलगुरू प्रा. वायुनंदन यांनी वेगळा आदर्श निर्माण केला आहे. कुलगुरू पदावर काम करताना सामान्यातल्या सामान्य माणूस आणि त्यांची मुले यांनाही चांगले ज्ञान आणि योग्य दिशा देण्यासाठी धडपड करणाऱ्या कुलगुरूंबद्दल सर्वांच्याच मनात कुतूहल निर्माण झाले आहे.

कुलगुरूंनी त्यांना ग्रंथालय खुले करून पुस्तके वाचण्यासाठी प्रोत्साहन दिल्याने खूपच आनंद झालाय. आम्ही जास्त शिकलो नाही, पण आता मुलांना पुस्तकांची गोडी लागल्याने त्यांनी चांगले शिकावे, मोठे अधिकारी व्हावे असे वाटते.

- पोपट गोतरणे, चतुर्थश्रेणी कर्मचारी, मुक्त विद्यापीठ

एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना
चिरंतन ज्ञानाची साधना
ज्ञान हेच संजीवन साऱ्या जगताच्या जीवना
नव्या युगाचा नव्या जगाचा ज्ञान धर्म आहे
त्यातच अमुच्या उजळ उद्याचे आश्वासन राहे
मुक्त करिल तो परंपरेच्या बंदिघरातुन मना

- कुसुमाग्रज